जिल्हा माथाडी मंडळातील कामकाजाकरिता
संगणक प्रणाली विकसित करण्याबाबत .

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक: युडब्ल्युए-२०१४/प्र.क्र.५८३/कामगार-५,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०८ मार्च, २०१९

वाचा:-

१. शासन निर्णय क्रमांक: एसजीए-२०१७/प्र.क्र.९९/कामगार-५,
दिनांक : १० ऑक्टोबर,२०१८

२. सहायक कामगार आयुक्त तथा मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ यांचे पत्र क्र. भाकाम /२०१९/०९, दिनांक: ११ फेब्रुवारी, २०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार ( नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ आणि त्या अंतर्गत योजना ( सुधारणा) मधील तरतुदीनुसार राज्यातील माथाडी आणि इतर श्रमजीवी कामगार व त्यांच्या कल्याणासाठी तसेच सदर कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. माथाडी मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळामध्ये कार्यरत असलेली संगणक प्रणाली जुनी असल्यामुळे दैनंदिन काम करताना उद्भवणा-या अडचणी विचारात घेता मंडळाने अद्ययावत संगणक प्रणाली विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने मंडळाने संगणक प्रणाली अद्ययावत करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबवून पात्र निविदाकारक याची निविदा स्विकारण्याचा निर्णय घेऊन सहायक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, मुंबई भाजीपाला बाजार व असंरक्षित कामगार मंडळ यांनी संदर्भाधिन दिनांक ११/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रक्रियेस मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

राज्यातील सर्व जिल्हा माथाडी मंडळे ही स्वायत्त: मंडळे असून मंडळांना शासनाकडून कोणतेही अनुदान दिले जात नाही. महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार ( नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ मधील तरतूदीनुसार व अधिनियमांतर्गत माथाडी मंडळाच्या योजने अंतर्गत योजनेची अंमलबजावणी करण्याची मंडळाची वैधनिक जबाबदारी आहे.

मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ यांनी मंडळाच्या कामकाजाकरिता अद्ययावत संगणक प्रणाली राबविण्याकरिता पार पाडलेल्या निविदा प्रक्रियेनुसार, स्विकारलेल्या पात्र निविदाकार मे.सेराईज टेक सोल्युशन्स प्रा.लि. पुणे यांच्या मार्फत संगणक प्रणाली अद्ययावत करण्यास व संगणक प्रणाली मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ व इतर सर्व माथाडी मंडळे यांना देखील लागू करण्यास खालील अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात येत आहे :-

१. सदर संगणक प्रणालीबाबत मंडळ व संस्थेदरम्यान प्राथमिक स्तरावर ३ वर्षाचा सेवा पुरविण्याचा करार अंतर्भूत असावा.

२. संगणक प्रणाली अद्ययावत करण्याकरिता व्यवसाय शुल्क प्रतिमाह प्रति कामगार रु.१०.०० व डेटा एंट्रीशुल्क रु.१०.०० प्रति डेटा एंट्री इतकेच राहिल.

३. संगणक प्रणालीवरील Scope of Work मध्ये आवश्यकतेनुसार विनामुल्य सुधारणा करण्याबाबत मंडळास अधिकार राहतील.

४. संगणकावरील मंडळाच्या सर्व प्रकारच्या माहितीची (डेटा) मालकी मंडळाकडे राहील. माहिती (डेटा) करप्ट होणार नाही अथवा तिची चोरी होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील माहिती करप्ट/चोरी झाल्यास मंडळामार्फत नुकसान भरपाईची मागणी करण्यात येईल व ती करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

५. संस्थेने मंडळाचे कामकाजाचे Monthly Backup ठेवणे आवश्यक राहील.

६. संस्थेने मंडळाच्या कार्यालयात डेटा सेंटर ठेवल्यास त्यास मंडळाचे नियमानुसार वापरातील जागेचे भाडे देणे बंधनकारक राहील.

७. संगणक प्रणालीमधील सर्व यंत्रसामुग्रीची ( Hardware + software) ची मालकी मंडळाकडे राहील व ती मंडळाच्या परवानगीशिवाय इतरत्र/ बाहेर नेता येणार नाही.

८. संस्थेने कामकाजाची गोपनीयता राखण्याचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

९. Intellectual Property Rights मंडळाकडे रहातील. तसा करार मंडळासोबत सुरुवातीलाच करणे बंधकारक राहील.

१०. मुंबई भाजीपाला व बाजार असंरक्षित व इतर कामगार मंडळ व इतर सर्व माथाडी मंडळानी उक्त संस्थेशी वरील सर्व अटींसह सेवा करार करुन अंतिम केलेल्या मसुद्यात कार्यादेश द्यावेत.

११. सदर संस्थेस कार्यादेश ( Work Order) देणे किंवा याबाबत त्यांच्या सेवा घेण्याबाबत त्यांच्याशी सेवेबाबत अटी व शर्तीसह कंत्राट/ सामंजस्य करार ( MOU) करणे आवश्यक राहील. सेवा देण्यावरुन किंवा सेवेचा मोबदला देण्यावरुन काही विवाद उपस्थित झाल्यास करारातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही करणे शक्य होईल. या कार्यवाहीकरिता सह कामगार आयुक्त (माथाडी) व सहायक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ सर्व प्रक्रियेचे जबाबदारीने समन्वय करतील.

वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त आवश्यक त्या अटी मंडळाने करारपत्रकात अंतर्भूत कराव्यात.

हा शासन निर्णय महाराष्ट्र माथाडी हमाल व श्रमजीवी असंरक्षित कामगार ( नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम ७(४) अन्वये शासनास असलेल्या प्राधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०८१८१०१०१४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr.Shrikant L. Pulkundwar

Digitally signed by Dr.Shrikant L. Pulkundwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, serialNumber=c10a1e6c8fbe08c1180978bd3ed8a151ed05202d522b09b9960341c2f080906d, cn=Dr.Shrikant L. Pulkundwar
Date: 2019.03.11 15:12:59 +05'30'

**( डॉ.श्रीकांत ल.पुलकुंडवार)**
**शासनाचे उप सचिव**

प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (पत्राने )
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, अ-६, मंत्रालय समोर,नरिमन पॉईट, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
८. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण आणि क्रिडा विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
९. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१०. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई,
१३. सर्व सह सचिव / उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. सह कामगार, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई
१५. कामगार उप आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई
१६. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१७. अध्यक्ष, सर्व माथाडी मंडळे/ सर्व सुरक्षा रक्षक मंडळे
१८. सर्व अवर सचिव /कार्यासन अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई,
१९. मे.सेराईज टेक सोल्युशन प्रा.लि. प्रिस्टन वुडस्, २९/अे, न्यू डी.पी.रोड, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११ ०२७.
२०. निवड नस्ती (कामगार-५).